|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) : विद्यार्थी व महाविद्यालये यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम लागू करण्याचा निर्णय अधिष्ठाता व सर्व अभ्यासमंडळ अध्यक्षांच्या बैठकीत आज घेण्यात आला.

कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार दि.१२ जुलै रोजी ही बैठक विद्यापीठात झाली. या बैठकीत चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम अर्थात 'सीबीसीएस' प्रणालीवर सविस्तर चर्चा झाली. जागतिक पातळीवरील शैक्षणिक क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी या स्पर्धेत टिकावा यादृष्टीने जे नवे बदल करता येतील त्या बदलांना सामोरे जाण्याचा सर्व अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांनी या बैठकीत निर्धार व्यक्त केला. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी या बैठकीत मार्गदर्शन करताना 'सीबीसीएस' प्रणालीचे फायदे विषद केले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे व नवीन विद्यापीठ कायदा लक्षात घेऊन ही प्रणाली या शैक्षणिक वर्षापासून लागू केली जाणार आहे. ही प्रणाली लागू करताना येणाऱ्या अडचणींवर मात केली जाईल कारण उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे वेळोवेळी आलेल्या अडचणींवर मात करून उभे राहिलेले आहे व या विद्यापीठाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अशी भावना व्यक्त करून कुलगुरुंनी या प्रणालीमुळे प्राध्यापकांच्या कार्यभारावर कोणताही परिणाम होणार नाही आणि परिणाम झाल्यास विद्यापीठ हे प्राध्यापकांच्या पाठीशी पुर्णत: उभे राहील. प्रसंगी शासन दरबारी याबाबत पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही बैठकीत दिली.

'सीबीसीएस' प्रणाली प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे सर्व अभ्यासक्रम तयार करण्यात आले असून महाविद्यालयाच्या प्राचार्यांना या बाबतीतील सर्व सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती बैठकीत देण्यात आली. सर्वच अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांनी ही प्रणाली लागू करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. नॅक, रूसा आणि एनआयआरएफच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील ही प्रणाली अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात आलेली नसेल, त्या महाविद्यालयांना रूसाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही. असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. त्यामुळे ही प्रणाली यावर्षापासून लागू करणे अपरिहार्य आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांच्या रोजगार वाढीसाठीच होणार आहे, असे मत या बैठकीत व्यक्त झाले.

या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी या प्रणालीच्या अनुषंगाने तांत्रिक माहिती दिली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, अधिष्ठाता प्राचार्य पी.पी.छाजेड, प्राचार्य प्रमोद पवार आणि सर्व अभ्यासमंडळांचे अध्यक्ष उपस्थित होते.

---

जा.क्रं. : उमवि/16/ हस्तदेय /2018 — दिनांक : 12 जुलै, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office  जनसंपर्क विभाग

### बातमी क्र. १

जळगाव. दि. १२ ( ) संगणक युगात जीवन गतीमान आणि सुखकर झाले असले तरी डेटा सुरक्षा आणि सायबर सुरक्षा हे कळीचे मुद्दे बनून समोर येत असल्याचे प्रतिपादन कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील यांनी केले.

क्वीक हेल फाऊडेंशन आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत गुरुवार दि. १२ जुलै पासून माहिती तंत्रज्ञान उद्योगात सी आणि सी प्लस या दोन प्रोग्रॅमिंग भाषेच्या असलेल्या महत्वाबाबत संगणक विषयाच्या प्राध्यापकांच्या दोन दिवसीय विकास कार्यक्रम कार्यशाळेला प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना कुलगुरु प्रा. पाटील बोलत होते. यावेळी मंचावर संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही. पवार, क्वीक हेल फाऊंडेशनच्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारी संभाळणाऱ्या कार्यकारी अधिकारी सुगंधा दाणी, समन्वयक प्रा. मनीष जोशी उपस्थित होते.

कुलगुरु म्हणाले की क्वीक हेल ही अग्रगण्य आय टी सुरक्षा देणारी कंपनी असून विद्यापीठासोबत सीएसआर अंतर्गत या कंपनीसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व घटकांना त्याचा फायदा होणार आहे. अशा शिक्षक विकास कार्यक्रमामुळे संगणक शिक्षक हे सी व सी प्लस प्लस या दोन महत्त्वाच्या प्रोग्रॅमिंग भाषेचे माहिती तंत्रज्ञान उद्योगात असलेले महत्त्व जाणून घेवून आपआपल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतील असा विश्वास आहे.

प्रा. मनीष जोशी यांनी या कराराअंतर्गत येणाऱ्या मुद्यांबाबत माहिती दिली. या कार्यक्रमात तीनही जिल्ह्यातील पन्नास प्राध्यापक सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहलता शिरुडे यांनी केले. डॉ. संदीप भामरे यांनी आभार मानले. आज दिवसभराच्या या कार्यक्रमात सुंगधा दाणी यांनी प्रोग्रॅमिंग भाषेबाबतची सविस्तर माहिती दिली.

दरम्यान क्वीक हेल फाऊडेशन व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तीनही जिल्ह्यात सायबर सुरक्षेच्या अनुषंगाने पाचवी ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जाणार आहेत. त्यासाठी बुधवार दि. ११ जुलै रोजी श्रीमती सुगंधा दाणी यांनी विद्यापीठ प्रशाळेतील ५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण घेतलेले हे विद्यार्थी सप्टेंबर अखेरपर्यंत तीनही जिल्ह्यात २० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून सायबर सुरेक्षेच्या संदर्भात त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. प्रशिक्षण देणाऱ्या विद्यार्थ्यांना सामंजस्य कराराअंतर्गत मानधनही दिले जाणार आहे. क्वीक हेल फाऊंडेशनच्या वतीने हा खर्च केला जाणार आहे. अशी माहिती प्रा. मनीष जोशी यांनी दिली.

---

### बातमी क्र. २

जळगाव. दि. १२ ( ) अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षा निमीत्त शनिवार दि. १४ जुलै रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात होणाऱ्या परिसंवादात खान्देशातील एक हजार पेक्षा अधिक शेतकरी, संशोधक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि विद्यार्थी सहभागी होत आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने `विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारे संपत्ती निमिर्ती ` या विषयावर पदवी प्रदान सभागृहात शनिवारी दिवसभर परिसंवाद होणार आहे. डॉ. अनिल काकोडकर हे स्वतः यामध्ये सहभागी होणार आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीमध्ये काय नवे प्रयोग करता येतील व त्यातून समृध्दी कशी आणता येईल या विषयावर दिवसभर मंथन होणार असून यशस्वी प्रयोग केलेल्या कार्यकर्त्यांना, संस्थाना देखील यासाठी प्राचारण करण्यात आलेले आहे. संशोधन हे समाजपयोगी व्हावे यादृष्टीने देखील चर्चा होईल. खान्देशात शेतीच्या संदर्भात नवे प्रयोग, पाण्याची साठवण, शाश्वत शेती या विषयावर चर्चा केली जाईल. जवळपास ७०० पेक्षा अधिक जणांनी या परिसंवादासाठी नोंदणी केली असन १००० पेक्षा अधिक लोक सहभागी होतील असा अंदाज आहे.

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office | जनसंपर्क विभाग

कुलगुरु प्रा. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विद्यापीठात विविध समित्यांच्या अध्यक्षांची बैठक घेण्यात येवून तयारीचा आढावा घेण्यात आला. जवळपास १७ समित्या या कार्यक्रमासाठी स्थापन करण्यात आल्या आहेत. या आढावा बैठकीत प्र. कुलगुरु प्रा. पी.पी. माहुलीकर, व्य.प. सदस्य दिलीप पाटील, मुख्य समन्वयक प्रा. ए.बी. चौधरी, प्रा. एस.टी. बेंद्रे, जैन इरिगेशनचे डॉ. के.बी. पाटील यांच्यासह विविध समिती अध्यक्ष उपस्थित होते.

------------------------------------------------------------------------------------------------

**बातमी क्र. ३**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात एम.ए.(एम.सी.जे.) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा दि.१४ जुलै, २०१८ रोजी होणार आहे.

यु.जी.सी. पॅटर्ननुसार पत्रकारिता आणि जनसंवाद अभ्यासक्रमांची पुर्नरचना व रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक, मिडिया, जनसंपर्क, जाहिरात न्यू मिडिया क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या युवकांना सुवर्ण संधी उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतो. प्रवेश पूर्व परीक्षेत सामान्यज्ञान, लेखन कौशल्य व भाषांतर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. १४ जुलै २०१८ पर्यंत जनसंवाद व पत्रकारिता विभागात नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला www.nmu.ac.in भेट देण्याचे आवाहन जनसंवाद व पत्रकारिता विभाग प्रमुखांनी केलेले आहे.

------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्रं. : उमवि/16/ हस्तदेय /2018 | दिनांक : 12 जुलै, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी